## विभाग–१ : तात्त्विक

# घटक १ : ग्रंथालय आणि समाज

### प्रास्ताविक

ग्रंथालय शास्त्राचा उदय हा अलीकडच्या युगातील असला तरीही हे क्षेत्र बहुचर्चित आणि स्वीकारार्ह झाले आहे. सध्या आधुनिक काळात ही ज्ञानशाखा सर्वच क्षेत्रात गरजेची झाली आहे. आपल्या देशातील डॉ. एस. आर. रंगनाथन हे गणित शास्त्रातील प्राध्यापक असूनही त्यांनी अतिशय आवडीने या क्षेत्रात पदार्पण करून भरीव कामगिरी केली. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची आंतरराष्ट्रीय स्तरावर दखल घेऊन त्यांना भारतातील 'ग्रंथालय व माहितीशास्त्राचा जनक' ही उपाधी देऊन सन्मान केला गेला. तसेच भारत सरकारने त्यांचा १९५७ मध्ये पद्मश्री पदवी बहाल करून गौरव केला. डॉ.रंगनाथन यांचा जन्म दिनांक १२ ऑगस्ट हा 'राष्ट्रीय ग्रंथपाल दिन' म्हणून सर्वत्र साजरा केला जातो.



डॉ. शियाली रामामृत रंगनाथन (१२/०८/१८९२ ते २७/०९/१९७२)

### ग्रंथालय व माहितीशास्त्राचा उगम

ग्रंथालय शास्त्रात पुढील विविध विषयांचा सहभाग झालेला दिसून येतो – ग्रंथालय शास्त्राची तत्त्वे, ग्रंथालयीन सेवा, वर्गीकरण व तालिकीकारणाच्या विविध पद्धती व ज्ञान व्यवस्थापनाची नवीन तंत्रे इत्यादी. ग्रंथालय शास्त्रामुळे पारंपरिक वाचन साहित्य व माहितीचे घटक प्राप्त करण्याच्या नवीन पद्धती अस्तित्वात आल्या. त्यामुळे वाचकांना ग्रंथ सहजरीत्या उपलब्ध होऊ लागले.

याबरोबरच ग्रंथालये ही सामाजिक व सांस्कृतिक केंद्रे म्हणून उदयास आली आहेत. जगात तसेच आपल्या देशात ग्रंथालय शास्त्र वेगाने प्रगत होत आहे.

### १.१ ग्रंथालय संकल्पना : स्वरूप व कार्य

सुरुवातीस ग्रंथालये ही ग्रंथ एकत्रित ठेवण्याची



**माहीत आहे का तुम्हांला?**



भारतातील ग्रंथालय चळवळीचा प्रारंभ बडोद्याचे तिसरे श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांनी आपल्या संस्थानात योजनाबद्ध अशी मध्यवर्ती तसेच जिल्हावार, तालुकावार व ग्रामवार ग्रंथालये स्थापन करून केला. तसेच सर्वांत प्रथम त्यांनी ग्रंथपालनाचा अभ्यासक्रम १९११ मध्ये सुरू केला.

जागा आहे असे म्हटले जात असे. तर आजच्या काळात ग्रंथालय म्हणजे अभ्यास, संशोधन, संदर्भ आणि मनोरंजन याकरिता केलेला ग्रंथसंग्रह होय. ग्रंथालयांचे प्रमुख कार्य समाजाचे मानवी विचार व ज्ञान यांचे संकलन, जतन व संप्रेषण करणे होय.

**'ग्रंथालय' या संज्ञेच्या काही व्याख्या**

ग्रंथालय (Library) या संज्ञेचा उगम लॅटीन भाषेतील 'Liber' या शब्दापासून झालेला आहे. त्याचा अर्थ 'a book' (ग्रंथ) असा होतो.

(१) ऑक्सफर्ड इंग्लिश डिक्शनरी : ''ग्रंथालय म्हणजे ज्या इमारतीमध्ये अथवा जागेत ग्रंथ, नियतकालिके आणि इतर वाचन साहित्य आणि काही वेळेस फिल्म्स, म्युझिक रेकॉर्ड्स संग्रहित केलेले असतात. ही साधने वाचकांना संदर्भाकरिता अथवा उपयोग करण्याकरिता दिली जातात.''

(२) हॅरॉड्स लायब्ररियन्स ग्लॉसरी अँड रेफरन्स बुक : ''ग्रंथालय म्हणजे – (अ) वाचन, अभ्यास आणि संदर्भाकरिता ग्रंथ आणि इतर वाङ्मयीन साहित्य यांचा संग्रह; (ब) अशी स्वतंत्र जागा ज्यामध्ये वाचन साहित्याचा संग्रह केलेला असतो.''

(३) डॉ.एस.आर.रंगनाथन : ''ग्रंथालय ही एक सार्वजनिक संस्था असून जी ग्रंथसंग्रहाची निगा राखते

व ज्यांना जो ग्रंथ हवा असतो त्यांना तो उपयोगाकरिता उपलब्ध करून देते.''




ग्रंथालय

**ग्रंथालयांची भूमिका :**

सर्वसाधारणपणे ग्रंथालये ही सामाजिक सर्जनशीलतेमध्ये महत्वाची भूमिका पार पाडतात आणि यामुळे ग्रंथालये ही व्यक्तिगत तसेच सामाजिक प्रगतीसाठी मदत करतात. या सर्वांमुळे ग्रंथालयांना सामाजिक संस्था असे संबोधले जाते.

ग्रंथालयांची भूमिका वाचकांना उपयुक्त सेवा प्रदान करून ज्ञान विकास करण्यास मदत करण्याची आहे. तसेच वैयक्तिक आणि सामाजिक प्रश्न सोडवण्यासाठी ग्रंथालयीन वाचन साहित्याचा उपयोग केला जातो.

**ग्रंथालयाची कार्ये :** माहिती व ज्ञानाधिष्ठित समाजाची निर्मिती जशी होत गेली तशी ग्रंथालयांची जबाबदारीही वाढत गेली. आधुनिक काळात ग्रंथालयांना/ग्रंथपालांना समाजाचा बौद्धिक वारसा प्राप्त झाला आहे. हा बौद्धिक वारसा वाङ्मयीन कलाकृतींच्या/साहित्यामार्फत ग्रंथालयात आला आहे. या बौद्धिक वारशाचे संवर्धन करणे व समाजाच्या माहितीविषयक गरजांचे समाधान या माहितीच्या साधनांमधून करणे हे ग्रंथपालांचे मूलभूत कार्य होय. या व्यतिरिक्त खालील कार्ये ग्रंथालयांना पार पाडावी लागतात.

(अ) ग्रंथांचे उपार्जन करणे, ग्रंथावर तांत्रिक प्रक्रिया करणे, त्यांचे संवर्धन करणे व ग्रंथसंग्रहाची माहिती वाचकांना करून देऊन ग्रंथांचा वापर वाढवणे.

(आ) माहिती सेवा प्रदान करणे व माहितीचे प्रसारण करणे (Dissemination of information).

(इ) नागरिकांचे जीवनमान उंचवण्यासाठी व वैयक्तिक जीवन समृद्ध करण्यासाठी संधी प्राप्त करून देणे.

(ई) स्वयंअध्ययन तसेच निरंतर अध्ययनास मदत करणे.

(उ) वाचकांना अचूक माहिती देण्याचा प्रयत्न करणे.

**ग्रंथपालन म्हणजे काय?**

ग्रंथपालन क्षेत्र हा एक व्यवसाय आहे असे संबोधले जाते. व्यवसाय म्हटल्यास त्या क्षेत्राची पुढील जबाबदारी असते – व्यवसायाची प्रतिष्ठा, तत्वज्ञान आणि नीतिमूल्ये यांचे जतन करणे. कोणत्याही व्यवसायाची महत्वाची दोन वैशिष्ट्ये जी विविध संज्ञांच्या साहाय्याने मांडली जातात. ती म्हणजे –

**(१) सामाजिक सेवा :** व्यवसाय म्हणजे एक अशी सेवा जी मानवतेच्या फायद्यासाठी व त्यागाकरिता दिली जाते. जसे वकिली व्यवसायात कायदे, न्याय यांच्याशी निगडित सेवा.

**(२) बौद्धिक माहिती अधिष्ठान :** कोणत्याही व्यवसायात बौद्धिक ज्ञानाचे अधिष्ठान असावे.

वरील घटकांच्या आधाराने असे म्हणता येईल की, ग्रंथपालन हा सेवेस समर्पित केलेला घटक असून जो वाचकांमध्ये वाचन संस्कृतीचा विकास करण्यात तसेच सामाजिक ज्ञान वृद्धिंगत करण्यास मदत करतो. यामुळे ग्रंथपालन हा एक व्यवसाय समजला जातो. कारण, लोकशाही वृद्धिंगत होण्यास ग्रंथपालनाची भूमिका महत्वपूर्ण मानली गेली आहे.

ग्रंथपालन व्यवसायाचे तत्वज्ञान व शास्त्र म्हणून त्याचा उदय हा काही गृहीतांच्या व तंत्रांच्या साहाय्याने झालेला आहे. ग्रंथपालांनी स्वतः ग्रंथपालनाचे तत्वज्ञान काय व वाचक ग्रंथांचा कोणत्या कारणाकरिता उपयोग करतो हे समजावून घेतले व नवीन ग्रंथपालनाच्या पद्धती विकसित केल्या.

**ग्रंथपाल एक मध्यस्थ :** ग्रंथपालाची सामाजिक भूमिका म्हणजे ग्रंथालयातील मुद्रित व अमुद्रित वाचन साहित्याचा जास्तीत जास्त वापर व्हावा यासाठी प्रयत्न

करणे. थोडक्यात, असे म्हणता येईल की ग्रंथपाल हा वाचक व वाचन साहित्य या दोघांमधील दुवा आहे. म्हणजेच मानवी ज्ञानवृद्धीमध्ये ग्रंथपाल महत्त्वाची भूमिका पार पडतो.




ग्रंथपाल


**ग्रंथालय त्रिमितीची (Trinity) संकल्पना :**

ग्रंथपालाची भूमिका ही पुढील त्रिमितींच्या आधारे स्पष्ट करता येईल.

(अ) जे.एच.शेरा यांच्या मते, त्रिमितीच्या एका बाजूस वाचन साहित्य असून दुसऱ्या बाजूस वाचक ही संकल्पना दृष्टिगोचर होते आणि त्रिमितीचा पाया हा वाचन साहित्य व वाचक यांना एकत्रित आणतो. ग्रंथालयाचे उद्दिष्ट त्रिमितीच्या पायावर आधारित असून ज्यामुळे वाचक व वाचन साहित्य यांची एकत्रित जोड मानवी दृष्टिकोनातून प्रस्थापित करणे. म्हणजेच ग्रंथपाल हा वाचक व वाचन साहित्यामधील दुवा समजला जातो.




(आ) डॉ. एस. आर. रंगनाथन यांनी ग्रंथालय शास्त्रात 'ग्रंथालय त्रिमिती' ची संकल्पना मांडली. त्यांच्या मते, "ग्रंथालय हे ग्रंथसंग्रह, वाचक व ग्रंथालय कर्मचारी यांची त्रिमिती होय." हे तीनही घटक एकमेकांशी संबंधित आहेत त्यामुळे ग्रंथालयास सामाजिक संस्था म्हणून संबोधले जाते. 'ग्रंथ' हे सर्व वाचन साहित्याचे प्रातिनिधिक स्वरूप आहे. ज्यामध्ये ग्रंथ, नियतकालिके, नकाशे, दृक्-श्राव्य साधने तसेच इतर साधने समाविष्ट होतात. वाचकाची तुलना ही समाजाच्या विविध घटकांशी केलेली आहे जे प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणे ग्रंथालयाच्या ग्रंथसंग्रहावर अवलंबून असतात, उदा., विद्यार्थी, शिक्षक, अभ्यासक, संशोधक इत्यादी. ग्रंथालयातील कर्मचारी हे ग्रंथसंग्रह व वाचक यांच्यामधील दुवा आहेत. माहितीची साधने व वाचक यांच्यात दुवा निर्माण करण्यात ग्रंथालय कर्मचारी निर्णायक भूमिका बजावतात.




**ग्रंथपालाची प्रमुख कार्ये**

जे. एच. शेरा (१९७०) यांच्या मते, ग्रंथपालाची प्रमुख कार्ये पुढीलप्रमाणे-

(अ) ग्रंथपालास त्याच्या ग्रंथालयातील वाचन साहित्याची व त्यामध्ये असलेल्या माहिती व ज्ञान घटकांची पूर्णतः माहिती असावी.

(ब) वाचकाबद्दलही त्यास पूर्णतः माहिती असायला हवी. त्याचे कारण या दोन्हींचीही एकत्रित सांगड घालणे आवश्यक असते.

(क) ग्रंथपाल हा वाचकांना व्यक्तिगत ग्रंथालय सेवा देतो. हे वाचक सामूहिकरीत्या समाजाचे घटक असतात.

(ड) याव्यतिरिक्त ग्रंथपाल हा ज्ञान प्रसारणाच्या कार्यात प्रमुख भूमिका बजावतो. ज्यामध्ये तो वाचकांच्या गरजेनुसार माहितीची प्रतिप्राप्ती करून वाचकांस उपलब्ध करून देतो.

### ग्रंथालय व ग्रंथालय शास्त्राचे सामाजिक परिणाम

ज्ञानाधिष्ठित समाजात ग्रंथालय हा महत्त्वाचा घटक आहे. याद्वारे मानवाच्या ज्ञानविषयक गरजांची पूर्ती होते आणि ज्ञानाचा प्रसार पिढ्यान्‌पिढ्या होत राहतो. ज्ञान संप्रेषण प्रक्रियेत ग्रंथालये ही महत्त्वपूर्ण घटक आहेत. याद्वारे वैयक्तिक आणि सामाजिक प्रगती साधली जाते.


ग्रंथालयांमुळे विश्वात शांततानिर्मिती व लोकशाही वृद्धिंगत होते, मानवतावाद वाढीस लागतो तसेच सर्वत्र ज्ञान व आर्थिक समृद्धी वाढीस लागते. ग्रंथालयांमुळे जागतिक स्तरावर सांस्कृतिक आदान-प्रदान वाढीस लागते तसेच नीतिमूल्यांची जपणूक व वाढ होण्यास मदत होते.

ग्रंथालयांमुळे ज्ञानात नवीन भर पडते व नवीन संशोधनात्मक शाखांची निर्मिती होण्यास मदत होते. यामुळेच ज्ञान वर्गीकरण व विविध सेवा पद्धतींची निर्मितीही दिसून येते.

## १.२ ग्रंथालयांचा इतिहास व विकास

ग्रंथालये ही सुरुवातीच्या काळात अभिलेखागार (Archives) व वस्तुसंग्रहालये (Museums) या स्वरूपात होती. त्यामध्ये उपलब्ध असलेले वाचन साहित्य हे इष्टिका ग्रंथ (Clay Tablets), भूर्जपत्र (Papyrus), चर्मपत्र (Vellum) या स्वरूपांत होते. नंतर कागद व छपाईचा शोध लागल्यानंतर छापील ग्रंथ व इतर वाचन साहित्याच्या साहाय्याने ग्रंथालये विकसित होऊ लागली.




प्राचीन वाचन साहित्य

प्राचीन काळातील पुराण वस्तू स्वरूपातील ग्रंथालये विविध टोळ्यांमधील युद्धांमुळे नष्ट झाली.

**प्राचीन काळ** (Ancient Period) **:** प्राचीन काळी इजिप्त आणि ॲसिरिया येथील सुमेरियामध्ये शासकीय कागदपत्रे व धार्मिक वाचन साहित्य अभिलेखागार या स्वरूपात ग्रंथालये अस्तित्वात होती. निनेवेह येथे ख्रिस्तपूर्व ७०० वर्षांपूर्वी एक ग्रंथालय अस्तित्वात आले. या ग्रंथालयात चर्मपत्राच्या गुंडाळ्या व भूर्जपत्रांवर ज्ञान नोंदवलेले होते. ॲसिरियन व बॅबिलोनियन काळातही ग्रंथालये अस्तित्वात असल्याची नोंद मिळते. या ग्रंथालयांमध्ये 'वर्गीकृत तालिका' असल्याचा पुरावा पण मिळतो. ग्रीस व इजिप्त या देशांमध्येही ग्रंथालये स्थापन केली गेल्याचा पुरावा प्राप्त झाला आहे. ग्रीकमध्ये ॲरिस्टॉटलने खऱ्या अर्थाने पहिले ग्रंथालय स्थापन केले. तसेच इजिप्तमधील ॲलेक्झांड्रिया येथील ग्रंथालय टोलेमी (Ptolemy) कुटुंबीयांनी स्थापन केले होते. टोलेमी पहिला, दुसरा व तिसरा यांनी स्थापन केलेल्या ग्रंथालयातील ग्रंथसंग्रहाचे वर्गीकरण व सूचीही तयार केल्या होत्या. रोममध्येही तत्कालीन राजांनी युद्धात जिंकलेल्या वस्तूंचे संग्रहालय केले होते. अशा संग्रहालयांस ग्रंथालये संबोधले जात असे.



अलेक्झांड्रिया येथील प्राचीन ग्रंथालय

**मध्ययुगीन काळ** (Medieval Period) **:** मध्ययुगात मुस्लिम देशांमध्येही ग्रंथालये स्थापन करण्यात आली होती. अरब जगतातील जेत्यांनी ग्रंथसंग्रह जमा करून ही ग्रंथालये उभारली होती. बगदाद हे मध्ययुगातील एक महत्त्वाचे शैक्षणिक केंद्र होते. येथे मोठ्या प्रमाणात ग्रंथालये होती.



मध्ययुगीन ग्रंथालय

**आधुनिक काळ** (Modern Period) **:** या युगात विज्ञानाचा प्रसार व विकास झाला. विज्ञानातील संशोधनपर ज्ञानाची देवाण-घेवाण होऊ लागली. एका देशातून विज्ञानविषयक माहितीचे दुसऱ्या देशात आदान-प्रदान होऊ लागले. विविध विषयांतील संशोधन, विशेषीकरण (Specialisation), आंतरविद्याशाखीय संबंधांत झालेली वाढ, शिक्षणातील वाढ व तंत्रज्ञानातील विकासामुळे पारंपरिक ज्ञान साधनांबरोबरच डिजिटल ज्ञान साधनांचा (Digital Resources) उदय झाला. त्यामुळे आधुनिक ग्रंथालये विकसित झाली. ग्रंथालयांच्या पद्धती व स्वरूपामध्ये बदल झाला. ग्रंथालयात नवीन सेवांचा उदय झाला. विविध ग्रंथालयांमध्ये सहकार्याचे नवीन पर्व सुरू झाले.

**भारतातील ग्रंथालयांचा विकास :** प्राचीन काळात भारतामध्ये ग्रंथालये अस्तित्वात होती. ही ग्रंथालये धार्मिक स्थळांमध्ये स्थापन केली होती. कारण त्या काळी बुद्धविहारे, मंदिरे, मशिदी ही शिक्षण घेण्याची स्थळे होती. शिक्षण घेताना काही संदर्भांची आवश्यकता असल्यास यामधील ग्रंथसंग्रहांचा आधार घेतला जात असे. भारतात प्राचीन काळापासून विद्यापीठे अस्तित्वात होती. उदा., नालंदा, तक्षशिला, विक्रमशिला, राजगृह, ओदंतापुरी, वल्लभी इत्यादी.



नालंदा विद्यापीठ आणि तेथील सुसज्ज ग्रंथालय बख्त्यार खल्जीने ११९३ मध्ये नष्ट केल्यानंतर उरलेले अवशेष

सर्व भारतीय प्राचीन विद्यापीठांमध्ये सुसज्ज व परिपूर्ण ग्रंथालये अस्तित्वात होती. अनेक आंतरराष्ट्रीय विद्वानांनी या ग्रंथालयांना भेटी दिल्याचा उल्लेख इतिहासात प्राप्त होतो. ब्रिटिशांच्या आगमनानंतर भारतात विद्यापीठे व महाविद्यालये स्थापन करण्यात आली. साहजिकच, शैक्षणिक ग्रंथालयांची उभारणी झाली. स्वातंत्र्यानंतर विज्ञान व तंत्रज्ञानाच्या विकास व संशोधनाकरिता संशोधन प्रयोगशाळा स्थापन करण्यात आल्या. त्यामुळे संशोधन ग्रंथालये अस्तित्वात आली. ख्रिश्चन मिशनऱ्यांनी सार्वजनिक ग्रंथालये स्थापन केली. विसाव्या शतकाच्या अखेरीस व एकविसाव्या शतकाच्या सुरुवातीस मोठ्या प्रमाणावर विविध क्षेत्रात ग्रंथालये स्थापन झालेली आहेत - तुरुंग ग्रंथालये, हॉस्पिटल ग्रंथालये, वृत्तपत्रे ग्रंथालये, औद्योगिक ग्रंथालये इत्यादी. याप्रमाणे भारतातही धार्मिक ग्रंथालयांपासून सुरू झालेला हा प्रवास सध्याच्या युगात व्हर्च्युअल ग्रंथालयांपर्यंत येऊन पोहोचला आहे.

## १.३ ग्रंथालयांचे प्रकार

वाचकांच्या विविध माहितीविषयक गरजा ग्रंथालयांमार्फत पूर्ण केल्या जातात. विविध कार्यक्षेत्रांसाठी विविध ग्रंथालये स्थापन झालेली आहेत. ती वाचकांना

माहिती सेवा देत असतात. उदा., संशोधन, मनोरंजन, औद्योगिक, व्यवस्थापन, शिक्षण इत्यादी. वाचकांचे प्रकार व मातृसंस्थेचे स्वरूप यावरून ग्रंथालयांचे पुढील चार ढोबळ प्रकार पडतात.

**१.३.१ राष्ट्रीय ग्रंथालय (National Library):** राष्ट्रीय ग्रंथालय हे राष्ट्राचे सर्वोच्च ग्रंथालय म्हणून संबोधले जाते.

**व्याख्या :** डॉ. एस. आर. रंगनाथन, ''देशांतर्गत प्रकाशित झालेली सर्व प्रकाशने संग्रहित करणे व ती जतन करणे हे राष्ट्रीय ग्रंथालयाचे प्रमुख कार्य होय. वैचारिक स्रोतांचे मध्यवर्ती स्थानी एकत्रित संग्रहण व प्रसारण करण्याचे हे प्रमुख स्थान होय.''

युनेस्कोच्या १९७० मध्ये भरलेल्या सर्वसाधारण चर्चासत्रात मांडली गेलेली राष्ट्रीय ग्रंथालयाची व्यापक व्याख्या पुढीलप्रमाणे : ''राष्ट्रीय ग्रंथालयाची त्याच्या शीर्षकानुसार देशांतर्गत प्रकाशित झालेल्या सर्व महत्त्वपूर्ण प्रकाशनांचे संकलन व जतन करणे ही त्यांची प्रमुख जबाबदारी असते. या ग्रंथालयांना डिलिव्हरी ऑफ बुक्स ॲक्ट १९५४ च्या कायद्याने 'डिपॉझिटरी ग्रंथालय' असे म्हणतात.''

**राष्ट्रीय ग्रंथालयाची कार्ये**

(१) भारतातील सर्व भाषांमधील प्रकाशित झालेले ग्रंथ संग्रहित करणे.
(२) राष्ट्रीय सूचीय माहितीकेंद्र म्हणून कार्य करणे.
(३) संघतालिका (Union Catalogue) तयार करणे.
(४) नियमित कालावधीत राष्ट्रीय ग्रंथसूचीची (National Bibliography) निर्मिती करणे.
(५) देशातील नागरिकांना माहिती सेवा पुरवणे.
(६) शासनास माहिती सेवा पुरवणे.
(७) देशात नवीन सार्वजनिक ग्रंथालये स्थापन करण्यास उत्तेजन देणे आणि त्यांना मार्गदर्शन करणे.
(८) प्रदर्शने भरवून विविध वाचन साहित्याची माहिती समाजास देणे.
(९) हस्तलिखितांचे आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने जतन करणे.
(१०) इतर देशांतील राष्ट्रीय ग्रंथालयांबरोबर प्रकाशनांची देवाण-घेवाण करणे.

**राष्ट्रीय ग्रंथालयांची उदाहरणे**

- भारतीय राष्ट्रीय ग्रंथालय, कोलकाता (भारत)
- लायब्ररी ऑफ काँग्रेस, वॉशिंग्टन (युएसए)
- ब्रिटिश लायब्ररी, लंडन (युके)
- बिब्लियोथेक नॅशनल डी फ्रान्स, पॅरिस (फ्रान्स) (नॅशनल लायब्ररी ऑफ फ्रान्स)



भारतीय राष्ट्रीय ग्रंथालय, कोलकाता

**सार्वजनिक ग्रंथालयांना नागरिकांचे सामाजिक व सांस्कृतिक विद्यापीठ समजले जाते.**

**१.३.२ सार्वजनिक ग्रंथालय (Public Library) :**

**व्याख्या :** युनेस्कोच्या १९४९ साली प्रकाशित झालेल्या जाहीरनाम्यात (Manifesto) सार्वजनिक ग्रंथालयाची व्याख्या पुढीलप्रमाणे दिली आहे.

''सार्वजनिक ग्रंथालय म्हणजे शिक्षण, संस्कृती, माहिती आणि शांतता प्रस्थापित करणारी, तसेच नागरिकांमध्ये व विविध देशांमध्ये सामंजस्य निर्माण करणारी अत्यावश्यक संस्था होय.''

साधारणतः स्थानिक स्वराज्य संस्थांनी नागरिकांच्या व समाजाच्या प्रत्येक घटकाच्या सांस्कृतिक विकासासाठी तसेच ज्ञानसंवर्धनाकरिता सार्वजनिक निधीतून स्थापन केलेले ग्रंथालय म्हणजे सार्वजनिक ग्रंथालय होय.

**हे नेहमी लक्षात ठेवा.**

सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये सर्वांना मोफत व मुक्त प्रवेश (Free to all) असतो. त्यात कोणत्याही प्रकारचा भेदभाव असू शकत नाही. या ग्रंथालयांद्वारे वाचनाच्या सवयी जोपासल्या जातात.



**सार्वजनिक ग्रंथालयांची कार्ये**

(१) सर्व नागरिकांना स्वयं-शिक्षण घेण्यास मदत करणे;

(२) समाजातील सर्व घटकांच्या ग्रंथ आणि माहितीविषयक गरजांची परिपूर्तता करणे;

(३) विविध शैक्षणिक, नागरी व सांस्कृतिक संस्थांच्या कार्यात मदत करणे;

(४) मनोरंजन आणि फावल्या वेळेचा सदुपयोग करून भरीव कार्यासाठी मदत करणे व प्रोत्साहन देणे;

(५) विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणे व अशा कार्यात मदत करणे;

(६) नागरिक व लहान मुलांमध्ये वाचन कौशल्ये विकसित करणे;

(७) माहिती साक्षरता कार्यक्रमांमध्ये नागरिकांना सहभागी करून घेणे व मदत करणे; आणि

(८) स्थानिक इतिहासासंदर्भातील वाचन साहित्य प्राप्त करून ते जतन करणे.

**सार्वजनिक ग्रंथालयांची उदाहरणे**

- दिल्ली पब्लिक लायब्ररी, नवी दिल्ली
- एशियाटिक सोसायटी लायब्ररी, मुंबई
- खुदाबक्ष लायब्ररी, पाटणा
- जिल्हा ग्रंथालये (महाराष्ट्रातील सर्व)
- पुणे नगर वाचन मंदिर, पुणे
- पुणे मराठी ग्रंथ संग्रहालय, पुणे




एशियाटीक सोसायटी लायब्ररी, मुंबई

**१.३.३ शैक्षणिक ग्रंथालये (Academic Libraries):** शैक्षणिक ग्रंथालयांचे प्रामुख्याने तीन प्रकार पडतात - शालेय ग्रंथालये, महाविद्यालयीन ग्रंथालये व विद्यापीठ ग्रंथालये.

**माहीत आहे का तुम्हांला?**

**पुस्तकपेढी योजना (Book Bank Scheme) :** आर्थिकदृष्ट्या कमी उत्पन्न असलेल्या विद्यार्थ्यांसाठी शिक्षण संस्थेमार्फत पुस्तकपेढी योजना राबवली जाते. त्याद्वारे त्यांना अभ्यासक्रमास पूरक असलेली पाठ्यपुस्तके ग्रंथालयामार्फत वर्षभरासाठी अध्ययनाकरिता मोफत दिली जातात.

विविध कौशल्ये प्राप्त करण्यासाठी आणि व्यक्तिमत्त्व विकासात शैक्षणिक ग्रंथालयाचे महत्त्व स्पष्ट करताना डॉ.रंगनाथन असे म्हणतात की,

‘‘शैक्षणिक ग्रंथालयाला शैक्षणिक संस्थेचे हृदय मानले जाते. ज्याप्रमाणे हृदय हे आपले शरीर निरोगी व जिवंत ठेवते, त्याप्रमाणे शैक्षणिक ग्रंथालये शैक्षणिक वातावरण सुदृढ ठेवतात.’’

**शैक्षणिक ग्रंथालयाची उद्दिष्टे :**

(१) शैक्षणिक व सामाजिक घटकांच्या माहितीविषयक गरजांची पूर्तता करणे.

(२) विविध प्रकारच्या शैक्षणिक व संदर्भ ग्रंथांचे उपार्जन करून संवर्धन करणे.

(३) संस्थांच्या विविध शैक्षणिक अभ्यासक्रमास लागणारे वाचन साहित्य उपलब्ध करून देणे.

(४) वाचकांना वाचनकक्ष सुविधा पुरवणे.

(५) वाचकांना द्यावयाच्या माहिती व संदर्भ सेवांचे नियोजन करणे.

(६) औपचारिक व अनौपचारिक शिक्षणात वेगवेगळ्या स्तरातील विद्यार्थ्यांना साहाय्य करणे.

**१.३.३.१ शालेय ग्रंथालय (School Library):** शालेय ग्रंथालय हे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासातील पहिली पायरी होय. या वयात विद्यार्थ्यांमध्ये वाचन-कौशल्ये विकसित करण्यात ही ग्रंथालये महत्त्वाची भूमिका पार पाडतात.

**शालेय ग्रंथालयाची कार्ये**

- विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे.
- शिक्षक व विद्यार्थ्यांच्या ज्ञान व माहितीविषयक गरजांची पूर्तता करणे.
- विद्यार्थ्यांमध्ये वाचन कौशल्ये व माहिती साक्षरता विकसित करणे.
- स्वयंशिक्षणाची क्षमता निर्माण करणे.
- व्यक्तिमत्व विकासात मदत करणे.
- विविध वाचन साहित्याची वाचकांना ओळख करून देणे.
- करमणुकीचे साहित्य उपलब्ध करून देणे. उदा., शाळांमधील ग्रंथालये.

**१.३.३.२ महाविद्यालयीन ग्रंथालय** (College Library) **:** शैक्षणिक प्रक्रियेत महाविद्यालय ग्रंथालये महत्त्वाची भूमिका पार पाडतात.

हॅरॉड्स लायब्ररियन्स ग्लॉसरी अँड रेफरन्स बुक या ग्रंथात 'महाविद्यालय ग्रंथालया'ची व्याख्या पुढीलप्रमाणे दिलेली आहे –

"विद्यार्थी व शिक्षकांच्या माहितीविषयक गरजा पूर्ण करण्याच्या दृष्टीने महाविद्यालयाच्या व्यवस्थापन मंडळामार्फत स्थापन केलेले, व्यवस्थापन करणारे आणि ज्याचे प्रशासन महाविद्यालयाच्या कर्मचाऱ्यांकडून केले जाते ते महाविद्यालय ग्रंथालय."

**महाविद्यालयीन ग्रंथालयाची कार्ये**

(१) शिक्षकांसाठी केली जाणारी कार्ये

- विषयासंदर्भात अद्ययावत ग्रंथ, नियतकालिके यांची माहिती देणे अथवा वाचन साहित्य उपलब्ध करून देणे.
- संशोधन कार्यात मदत करणे.
- आंतरग्रंथालयीन देवाण-घेवाण कार्यक्रमांतर्गत लागणारे संदर्भ व वाचन साहित्य उपलब्ध करून देणे.
- संदर्भ ग्रंथांविषयी माहिती देणे.
- ग्रंथालयाच्या उपयोगासंदर्भात मार्गदर्शन करणे.
- विविध प्रकारच्या माहिती सेवा पुरवणे.

(२) विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनातून केली जाणारी कार्ये

- विद्यार्थ्यांमध्ये वाचन कौशल्य विकसित करणे.
- अभ्यासासंदर्भातील सर्व वाचन साहित्य उपलब्ध करून देणे.
- मनोरंजनात्मक, ऐतिहासिक व विज्ञानविषयक माहिती देणारे वाचन साहित्य पुरवणे.
- करिअर मार्गदर्शन करणे. या संदर्भात स्पर्धा परीक्षांविषयी माहिती देणे. विविध स्पर्धा परीक्षांच्या दृष्टीने उपलब्ध ग्रंथ व नियतकालिके यांच्याविषयी माहिती देणे.
- वृत्तपत्र कात्रणे काढून अद्ययावत माहिती शिक्षक व विद्यार्थ्यांना पुरवणे.
- ग्रंथालयाचा उपयोग कसा करावा याविषयी मार्गदर्शन करणे. उदा., तालिकेतून ग्रंथाचा शोध घेणे इत्यादी.
- संदर्भ ग्रंथांची माहिती देऊन त्यातील मजकूर व त्या ग्रंथांचा उपयोग कसा करावा याविषयी मार्गदर्शन करणे.
- विविध विषयांवर मागणीनुसार सूची तयार करून विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देणे.
- ग्रंथमंडळाची स्थापना करणे व ग्रंथांवर चर्चासत्रे आयोजित करणे.

**महाविद्यालयीन ग्रंथालयाची उदाहरणे**

- नौरोसजी वाडिया महाविद्यालय, ग्रंथालय, पुणे
- स.प.महाविद्यालय, ग्रंथालय, पुणे
- जेरबाई वाडिया ग्रंथालय, फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे

**१.३.३.३ विद्यापीठ ग्रंथालय** (University Library)

**व्याख्या :** हॅरॉड्स लायब्ररियन्स ग्लॉसरी अँड रेफरन्स बुक यामध्ये दिलेली विद्यापीठ ग्रंथालयाची व्याख्या, "विद्यापीठातील विद्यार्थी आणि शिक्षक यांच्या अभ्यासविषयक गरजा भागवण्याच्या दृष्टीने विद्यापीठाने स्थापन केलेले आणि व्यवस्थापन केलेले

ग्रंथालय म्हणजे विद्यापीठ ग्रंथालय होय.''

इंटरनॅशनल एनसायक्लोपीडिया ऑफ इन्फॉरमेशन अँड लायब्ररी सायन्स यामधील व्याख्येप्रमाणे, ''जे ग्रंथालय ग्रंथ व इतर वाचन साहित्य उपार्जित करून त्याचे योग्य व्यवस्थापन करून वाचकांना माहितीविषयक सेवा देते ते विद्यापीठ ग्रंथालय होय.''

विद्यापीठ ग्रंथालय हे विद्यापीठातील विविध ज्ञानशाखांतील विद्यार्थी, शिक्षक व संशोधक यांच्याकरिता निर्माण केलेली ग्रंथालय प्रणाली होय. विद्यापीठ ग्रंथालयाचे प्रमुख वाचक हे पदव्युत्तर विद्यार्थी, शिक्षकवर्ग, संशोधन करणारे विद्यार्थी, संलग्न महाविद्यालयातील शिक्षकवर्ग, बहिःस्थ विद्यार्थी, स्थानिक नागरिक, शासकीय अधिकारी इत्यादी असतात.

या प्रकारच्या ग्रंथालयांत वाचकांसाठी अनेक प्रकारचे वाचन साहित्य, उदा., नियतकालिके, संदर्भ ग्रंथ, क्रमिक पाठ्यपुस्तके, संशोधन परिषद अहवाल, हस्तलिखिते, नकाशे व याबरोबरच डिजिटल प्रकाशने जसे ई-बुक्स, ई-जर्नल्स इत्यादींचे उपार्जन केले जाते. याव्यतिरिक्त इंटरनेटवरील वाचन साहित्यही हे ग्रंथालय वाचकांना उपलब्ध करून देते.

या ग्रंथालयांतून अभ्यासकांना विविध प्रकारच्या ग्रंथालयीन माहिती सेवा पारंपरिक व डिजिटल वाचन साहित्याच्या साहाय्याने पुरवल्या जातात.

**विद्यापीठ ग्रंथालयाची कार्ये**

- ग्रंथसंग्रह विकासाचे धोरण ठरवणे.
- विद्यापीठाच्या अभ्यासक्रमाशी निगडित विविध विषयांचे ग्रंथ, नियतकालिके व इतर वाचन साहित्य उपलब्ध करून देणे.
- आंतर ग्रंथालयीन देवाण-घेवाण कार्यक्रमांतर्गत वाचन साहित्य उपलब्ध करून देणे.
- संदर्भ ग्रंथांची ओळख करून देणे.
- ग्रंथालयाचा उपयोग कसा करावा या संदर्भात मार्गदर्शन करणे.
- विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन करणे.
- वृत्तपत्र कात्रण सेवा देणे.
- मागणीनुसार विषयवार सूची तयार करून देणे.
- पदव्युत्तर विद्यार्थ्यांना संशोधन प्रकल्प पूर्ण करायचा असतो. या संदर्भात त्यांना सूची कशी करावी, वाङ्मयशोध कसा करावा, संदर्भ कसे द्यावेत व संशोधन प्रकल्पाचा आराखडा या संदर्भात मार्गदर्शन करणे.
- ग्रंथ प्रदर्शन भरवणे.
- ग्रंथालयाचा वार्षिक अहवाल, ग्रंथालयाची नियमावली व अंदाजपत्रक तयार करणे.
- इंटरनेटद्वारे विविध सेवा पुरवणे.
- शिक्षक व संशोधक विद्यार्थ्यांना त्यांच्या संशोधनासाठी आवश्यक त्या माहिती सेवा पुरवणे.

**विद्यापीठ ग्रंथालयाची उदाहरणे**

- जयकर ग्रंथालय, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
- मुंबई विद्यापीठ ग्रंथालय, मुंबई
- कोलकाता विद्यापीठ ग्रंथालय, कोलकाता

### १.३.४ विशेष ग्रंथालये (Special Libraries)

विशेष ग्रंथालये इतर ग्रंथालयांपेक्षा वेगळी असून त्याच्या ग्रंथसंग्रहानुसार, वाचकास पुरवत असलेल्या सेवा पद्धतींनुसार किंवा वाचकांच्या वैशिष्ट्यांनुसार विविध प्रकार पडतात. उदा., दृष्टिदोष असलेल्या व्यक्तींचे ग्रंथालय, रुग्णालय ग्रंथालय, कारागृह ग्रंथालय, वृत्तपत्र ग्रंथालय इत्यादी.

सर्वसाधारणपणे ग्रंथालयांचे प्रकार हे वाचकांचे स्वरूप, वाचन साहित्य संग्रह व दिल्या जाणाऱ्या विविध ग्रंथालय सेवा यावरून ठरतात. विशेष ग्रंथालय ही संज्ञा साधारणपणे इ.स.१९०९ पासून उपयोगात येऊ लागली.

विशेष ग्रंथालयांमधील ग्रंथसंग्रह हा मर्यादित असतो. परंतु तो मुख्य विषय तसेच उपविषयांवर आधारित असतो. या ग्रंथालयाचे सभासद हे मातृसंस्थेशी संबंधित व्यक्ती असतात. यामुळे वाचक संख्याही मर्यादित असते. अशा स्वरूपाच्या ग्रंथालयांत विशेष स्वरूपाची संदर्भ सेवा दिली जाते. संदर्भ सेवा देण्याकरिता वृत्तपत्रे, माहितीपुस्तके, व्यापारी वाङ्मय, परिषदांचे

कार्यवृत्त, पेटंट्स, मानके, सारस्वरूप व निर्देशन नियतकालिके इत्यादी संदर्भ साहित्याचा उपयोग केला जातो.

विशेष ग्रंथालयांचे प्रकार पुढीलप्रमाणे –

**१.३.४.१ दृष्टिदोष असलेल्या व्यक्तींकरिताची ग्रंथालये (Libraries for Visually Handicapped) :** ही ग्रंथालये ब्रेल लिपीतील वाचन साहित्य उपलब्ध करून देतात. तसेच श्राव्य माध्यमांतील वाचन साहित्य उपलब्ध करून विविध सेवा पुरवण्याची कार्ये करतात. संगणक युगात तंत्रज्ञानाच्या मदतीने छापील ग्रंथातील मजकूर आवाजाच्या साहाय्याने ब्रेलमध्ये रूपांतरित करता येतो. उदा., ब्रेल लॅबोरेटरीजचे ग्रंथालय, नॅशनल इन्स्टिट्यूट फॉर द व्हिज्युअली हँडिकॅप्ड् (NIVH) संस्थेचे ग्रंथालय, डेहराडून.

**१.३.४.२ संशोधन ग्रंथालय (Research Library)**

हॅरॉड्स लायब्ररियन्स ग्लॉसरी अँड रेफरन्स बुक या कोशात दिलेली संशोधन ग्रंथालयाची व्याख्या, ''संशोधन ग्रंथालय म्हणजे ज्या ग्रंथालयात विशेष प्रकारचे प्रलेख असतात व व्यापक प्रमाणात संशोधन कार्य हाती घेण्याकरिता विविध स्वरूपाच्या सुविधा पुरवल्या जातात. विकास, चाचणी (Tests), प्रयोग (Experiments), अभियांत्रिकी आणि मूल्यमापन तसेच संशोधनाशी संबंधित संदर्भ सेवा देण्यात येतात. अशा ग्रंथालयांना संशोधन ग्रंथालय म्हणतात.'' उदा., सीएसआयआर–राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा ग्रंथालय, पुणे, इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्चचे नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ व्हायरॉलॉजी ग्रंथालय, पुणे.

संशोधन ग्रंथालयाचा संबंध हा संशोधन कार्याशी निगडित असतो. ज्याआधारे नवीन विषयाची, माहितीची, ज्ञानाची निर्मिती व विकास होतो. या ग्रंथालयाच्या वाचकवर्गामध्ये संशोधक व संशोधन करणारे विद्यार्थी यांचा समावेश असतो. त्यांच्यामार्फत संबंधित विषयांवरील प्रलेखांचा उपयोग मोठ्या प्रमाणावर केला जातो. अशा ग्रंथालयांमार्फत ग्रंथ व ग्रंथेतर (सूक्ष्म) प्रलेख उपार्जित केले जातात (पारंपरिक व अपारंपरिक).

या ग्रंथालयांमार्फत वेगवेगळ्या प्रकारच्या सेवा पुरवल्या जातात. जसे, प्रचलित जागरूकता सेवा (Current Awareness Service=CAS), निवडक माहितीचे प्रसारण सेवा (Selective Dissemination of Information=SDI), संदर्भ सेवा, भाषांतर सेवा, डेटाबेसद्‌वारे वाङ्‌मय शोध सेवा (literature search). तसेच,

१. सूची तयार करणे.
२. प्रलेखन सेवा प्रदान करणे.
३. नियतकालिकांतील लेखांचा निर्देश (Index) तयार करणे.
४. सारस्वरूप सेवा पुरवणे.
५. संशोधनासंबंधी अद्ययावत माहिती पुरवणे.
६. संगणकीय नेटवर्कमार्फत माहितीची प्रतिप्राप्ती करणे.

**संशोधन ग्रंथालयाची कार्ये**

(अ) ग्रंथ निवड, ग्रंथ उपार्जन, ग्रंथ व्यवस्थापन, ग्रंथ संवर्धन व माहिती संप्रेषण करणे.

(आ) एखाद्या विषयावरील माहितीचे संकलन व मूल्यमापन करणे व उपयुक्त माहितीची पुनर्बांधणी (Repackaging) करणे.

(इ) वाचकांना उच्च दर्जाच्या संशोधनासाठी उपयुक्त असे माहिती साहित्य पुरवणे. जसे वस्तुस्थितीदर्शक अहवाल (State of the art reports), समीक्षात्मक लेख (Critical review), व संशोधन अहवाल (Research reports) इत्यादी.

(ई) सारस्वरूप व निर्देशन सेवा देणे आणि साहित्यशोध सेवा पुरवणे.

(उ) विविध प्रकारच्या डेटाबेसेसमधून माहितीचा शोध घेऊन वाचकांना पुरवणे.

**१.३.४.३ रुग्णालयीन ग्रंथालय (Hospital Library) :** रुग्णालयीन ग्रंथालयामध्ये प्रामुख्याने आरोग्य व विज्ञानविषयक ग्रंथ, नियतकालिके इत्यादी वाचन साहित्य जतन करून रुग्ण व रुग्णांचे नातेवाईक ह्यांना वाचनसेवा व डॉक्टरांना उपयुक्त संदर्भ सेवा देण्याचे कार्य प्रामुख्याने केले जाते. उदा.,

- सह्याद्री रुग्णालयाचे ग्रंथालय, पुणे

- रूबी हॉल हॉस्पिटलचे ग्रंथालय, पुणे
- हाफकिन रिसर्च सेंटर हॉस्पिटलचे ग्रंथालय
- टाटा कॅन्सर रिचर्स सेंटर हॉस्पिटलचे ग्रंथालय, मुंबई

**१.३.४.४ औद्योगिक ग्रंथालय** (Industrial Library) : औद्योगिक ग्रंथालयांमध्ये प्रामुख्याने उद्योगधंद्याशी निगडित वाचन साहित्याचे जतन आणि माहितीचे संप्रेषण केले जाते. तसेच या ग्रंथालयांमध्ये उद्योगांशी निगडित संदर्भ सेवा देण्याचे प्रमुख कार्य केले जाते. उदा.,

- टाटा मोटर्स रिसर्च युनिटचे ग्रंथालय, पुणे
- बजाज ऑटो लि.चे ग्रंथालय, पुणे

**१.३.४.५ वृत्तपत्रे व माध्यमांची ग्रंथालये** (Newspaper/Media Libraries) : वृत्तपत्र कर्मचाऱ्यांच्या माहितीविषयक गरजा पूर्ण करण्याकरिता निर्माण केलेले ग्रंथालय म्हणजे वृत्तपत्र ग्रंथालय होय. अशा प्रकारच्या ग्रंथालयात संदर्भ ग्रंथांबरोबरच वृत्तपत्र लेख व कात्रणांच्या फाईल्स, संपादक व पत्रकार यांनी तयार केलेली टिपणे, पत्रके, अहवाल, शासकीय प्रकाशने व विविध छायाचित्रांचे संकलन व संग्रहण करून योग्य वेळी उपलब्ध करून दिले जातात. याबरोबरच इतरही महत्त्वपूर्ण ग्रंथ संग्रह ठेवण्यात येतो. उदा., सकाळ वृत्तपत्र ग्रंथालय, पुणे व टाईम्स ऑफ इंडियाचे ग्रंथालय, मुंबई.

इतर विशेष ग्रंथालये ही त्या त्या वाचकवर्गास सेवा पुरवतात. जसे, कारागृह ग्रंथालये तुरुंगातील कैद्यांना विरंगुळा मिळावा व त्यांचे प्रबोधन व पुनर्वसन होण्याच्या दृष्टीने वाचन साहित्य उपलब्ध करून देतात. कैद्यांचे ग्रंथोपचाराद्वारे (बिब्लियोथेरपी) मानसिक परिवर्तन होण्याच्या दृष्टीने ही ग्रंथालये प्रयत्न करतात. उदा., येरवडा मध्यवर्ती कारागृहाचे ग्रंथालय, पुणे. तसेच कॉर्पोरेट क्षेत्राशी संबंधित ग्रंथालयाची निर्मिती हा सध्याच्या काळातील प्रचलित प्रवाह अस्तित्वात आलेला दिसून येतो.

## १.४ ग्रंथालय शास्त्राची पंचसूत्री व त्यांचा ग्रंथालयावरील प्रभाव

डॉ.एस.आर.रंगनाथन यांनी ग्रंथालय शास्त्राची पाच सूत्रे १९२४ मध्ये विशद केली व ही सूत्रे १९२८ मध्ये निश्चित केली. १९३१ मध्ये ही सूत्रे 'फाईव्ह लॉज ऑफ लायब्ररी सायन्स' या शीर्षकाच्या ग्रंथात प्रकाशित केली. ही पाच सूत्रे व त्यांचा ग्रंथालयावर होणारा प्रभाव पुढीलप्रमाणे :

**१.४.१ ग्रंथ हे उपयोगासाठी आहेत.** (Books are for use) प्राचीन काळापासून ग्रंथालये ही खासगी संस्थानिकांची व्यक्तिगत मालमत्ता होती. सर्व ग्रंथ हे बंदिस्त जागेत ठेवले जात असत. परंतु, डॉ.रंगनाथन यांचे हे सूत्र असे सांगते की, ग्रंथांचा उपयोग होणे गरजेचे आहे. यासाठी मुक्तद्वार ग्रंथालयांचा विकास होणे आवश्यक आहे. तसेच, हे सूत्र ग्रंथालयीन सेवांवर भर देण्याचे कार्य करते. त्याचप्रमाणे, ग्रंथालयाची जागा, वेळा, फर्निचर हे वाचनास सोईस्कर असल्यास वाचक ग्रंथालयात बसून वाचन करणे पसंत करेल. यामुळे ग्रंथांचा उपयोग वाढीस लागेल.

**या सूत्राचा ग्रंथालयावरील प्रभाव :** या सूत्रानुसार डॉ. रंगनाथन यांनी ग्रंथालयाची जागा, ग्रंथालयाच्या वेळा, ग्रंथालयाचे फर्निचर व ग्रंथालयाचा कर्मचारी वर्ग तसेच ग्रंथनिवड यांवर लक्ष केंद्रीत केले आहे. सर्वसाधारण ग्रंथालयाची इमारत ही कोणत्याही संस्थेच्या मध्यवर्ती भागात असावी जेणेकरून सर्व वाचकांना ग्रंथालयात सहजासहजी जाऊन त्याचा वापर करता येईल. तसेच ग्रंथालयाच्या वेळा या वाचकांना सोईस्कर असाव्यात. ग्रंथालयाची इमारत व फर्निचर हे वाचकांना ग्रंथ वाचण्यासाठी सुलभ असावे व ग्रंथसंग्रह हा वाचकांच्या गरजांशी निगडित असावा. ग्रंथालय कर्मचारीवर्ग हा प्रशिक्षित असावा. त्याला ग्रंथालयातील सर्व कार्यपद्धती व सेवा देण्याच्या पद्धती माहीत असाव्यात. यामुळे हे सूत्र प्रभावी ठरू शकेल.

**१.४.२ प्रत्येक वाचकास त्याचा ग्रंथ मिळायला हवा** (Every reader his/her book)

या सूत्रानुसार डॉ.एस.आर.रंगनाथन यांना असे सूचित करायचे आहे की, ग्रंथालयात येणाऱ्या प्रत्येक वाचकास (स्त्री किंवा पुरुष) त्याच्या आवडी-निवडीचे, विषयाचे व इतर कारणांकरिता त्याला हवे असलेले वाचन साहित्य उपलब्ध व्हायला हवे. या दृष्टीने ग्रंथालयात वाचकांची गरज लक्षात घेऊन ग्रंथनिवड केली जावी असे निर्देशित केले आहे.

**या सूत्राचा ग्रंथालयावरील प्रभाव :** या सूत्रात प्रामुख्याने ग्रंथांचा वापर हा सर्वांसाठी असून त्यात कोणत्याही प्रकारचा भेदभाव असता कामा नये. जसे उत्पन्नगट, शहरी-ग्रामीण, अपंग, प्रौढ व बालके इत्यादींच्या आधारे भेदभाव न करता ग्रंथालय हे सर्वांकरिता मुक्त असावे. नागरिकांना अनौपचारिक, शाश्वत, स्वयंशिक्षण हे ग्रंथालयातून मिळायला हवे याकरिता शासनाने ग्रंथालय कायदा मंजूर करून ग्रंथालय सेवेची तरतूद करायला हवी. ग्रामीण भागापासून ते राष्ट्रीय पातळीपर्यंत सार्वजनिक ग्रंथालयांची साखळी निर्माण करावी.

त्याचप्रमाणे ग्रंथालयाच्या मातृसंस्थेने ग्रंथालय प्रणालीची तरतूद करावी व आर्थिक स्रोतांची निर्मिती करावी.

या दुसऱ्या सूत्रानुसार ग्रंथालय कर्मचाऱ्यांचीही जबाबदारी वाढते. त्यांनी वाचकांना ग्रंथालयाकडे आकर्षित करण्याचे कौशल्य प्राप्त करायला हवे. वाचकांना ग्रंथालय तालिका, वर्गीकरण यांविषयी माहिती देऊन ग्रंथसंग्रहासंबंधी अद्ययावत माहिती द्यावी. अशा पद्धतीने प्रत्येक वाचकास त्याला हवा असलेला ग्रंथ/वाचन साहित्य गरजेनुसार उपलब्ध करून द्यायला हवे. तसेच विविध ग्रंथालय सेवा उपलब्ध करून द्याव्यात.

**१.४.३ प्रत्येक ग्रंथास त्याचा वाचक मिळायला हवा (Every book its reader)** डॉ.रंगनाथन यांनी या सूत्राद्वारे असे सूचित केले आहे की, प्रत्येक ग्रंथास त्याचा वाचक मिळायला हवा. निरनिराळ्या युक्त्या वापरून वाचकास ग्रंथाचे आशय विश्लेषण करून ग्रंथांची उपयुक्तता पटवून द्यायला हवी. या सूत्राच्या उपयुक्ततेसाठी ग्रंथालये ही मुक्तद्वार असावीत. कपाटांची रचना विषय सुसंगत असावी, तालिका अद्ययावत व परिपूर्ण असावी. विस्तार सेवा व ग्रंथनिवड ही वाचकांच्या गरजांशी निगडित असावी. ग्रंथसंग्रह प्रदर्शन भरवून वाचकांना ग्रंथांविषयी जाणीव करून द्यावी.

**या सूत्राचा ग्रंथालयावरील प्रभाव :** या सूत्राचे समाधान करण्यासाठी मुक्तद्वार योजना (Open Access) असावी. तालिकेत ग्रंथांविषयी विविध प्रकारच्या नोंदी (लेखक, ग्रंथ शीर्षक, माला नोंद, विषय शीर्षक नोंद इत्यादी) असाव्यात. ज्यामुळे वाचकास ग्रंथाचे स्थान व निवड करणे सोपे जाईल.

ग्रंथालयात आलेल्या वाचन साहित्यास विविध मार्गांनी प्रसिद्धी देण्यात यावी (New Arrivals, विस्तार सेवा, लायब्ररी बुलेटीन याद्वारे प्रसिद्धी इत्यादी). ग्रंथवाचक मंडळाची (Book Club) स्थापना करण्यात यावी. लहान मुलांकरिता गोष्टींचा तास असावा. ग्रंथनिवड करताना वाचकांच्या गरजा लक्षात घेऊन ग्रंथसंग्रह उपार्जित केल्यास या सूत्रास न्याय देता येईल.

**१.४.४ वाचकांचा वेळ वाचवा (Save the time of the readers)** डॉ.रंगनाथन यांना असे सुचवायचे आहे की योग्य त्या वाचकांना योग्य तो ग्रंथ योग्य वेळी/विनाविलंब मिळावा यासाठी ग्रंथपालांनी विविध युक्त्यांचा अवलंब करणे आवश्यक आहे. जसे मुक्तद्वार, विषयवार कपाटांची रचना, वर्गीकरण, ग्रंथसंग्रह मार्गदर्शिका, तालिका, सूची, संदर्भ कार्य, ग्रंथ देवाण-घेवाण व ग्रंथालयाचे स्थान यांवर भर दिला पाहिजे. तसेच आधुनिक काळात तंत्रज्ञानाचा वापर करून विविध कार्ये व सेवा वाचकांना द्याव्यात.

**या सूत्राचा ग्रंथालयावरील प्रभाव :** चौथ्या सूत्रानुसार डॉ.रंगनाथन यांना ग्रंथालय व्यवस्थापन हे परिपूर्ण असल्यास वाचकांचा वेळ वाचेल असे सूचित करायचे आहे. ग्रंथालयात येणाऱ्या प्रत्येक वाचकास ग्रंथपालांनी विविध युक्त्या वापरून ग्रंथालय सेवा दिल्यास त्याचा वेळ वाचेल. यासाठी ग्रंथपालांनी ग्रंथालयात मुक्तद्वार पद्धती वापरणे, ग्रंथांचे वर्गीकरण करणे, वाचक सुलभ तालिकेची निर्मिती, जलद देव-घेव पद्धती इत्यादी युक्त्यांचा अवलंब केल्यास वाचकांचा वेळ वाचण्यास मदत होईल. यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग विविध कार्ये पार पाडण्यासाठी केला जावा.



**माहीत आहे का तुम्हांला?**

**मुक्तद्वार-प्रवेश पद्धती :** वाचकाला ग्रंथालयात ग्रंथसंग्रह कक्षामध्ये कपाटापर्यंत जाऊन ग्रंथ हाताळण्याची मुभा असते तिला 'मुक्तद्वार-प्रवेश पद्धती' (Open Access System) असे म्हणतात.

**१.४.५ ग्रंथालय ही वर्धिष्णू संस्था आहे (Library is a growing organism)** या सूत्रानुसार डॉ.रंगनाथन यांना असे सूचवायचे आहे की, ग्रंथालय ही वर्धिष्णू संस्था आहे. ग्रंथालयाच्या सर्व घटकामंध्ये सातत्याने वाढ होत असते, जसे ग्रंथ संख्या, ग्रंथसंग्रह कक्ष, तालिका, वर्गीकरण पद्धतीत नवीन विषय व संकल्पनांची भर पडते, वाचनकक्षाची वाढ, वाचकांच्या संख्येतील वाढ व ग्रंथालय कर्मचाऱ्यांच्या संख्येतील वाढ (पारंपरिक ग्रंथालय) होत असते.

**या सूत्राचा ग्रंथालयावरील प्रभाव :** या सूत्रात डॉ.रंगनाथन यांच्या मते वाढणाऱ्या घटकांचा ग्रंथपालांनी विचार करून त्यानुसार समाधानकारक नियोजन करणे गरजेचे आहे. सर्व घटकांच्या वाढींना सामोरे जाण्यासाठी ग्रंथालयीन इमारतीची भविष्यातील वाढ लक्षात घेऊन विस्तारीकरण करता येईल अशी रचना करण्यात यावी.

ग्रंथसंग्रह कक्षामध्ये नवीन ग्रंथांना सामावून घेण्याच्या दृष्टीने जागा सोडणे तसेच कॉम्पॅक्ट ग्रंथरचना (compact storage) इत्यादी. याव्यतिरिक्त ग्रंथालयाच्या सुरक्षिततेकरिता खिडक्यांना जाळ्या, अग्निशामक उपकरणे, ग्रंथांचे संवर्धन व जतन इत्यादी नियोजन करणे.

## १.५ डिजिटल व व्हर्च्युअल ग्रंथालये (Digital and Virtual Libraries)

**डिजिटल ग्रंथालय (Digital Library) :** डिजिटल ग्रंथालय म्हणजे सुसंघटित इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील प्रलेख संग्रह होय. हा संग्रह इंटरनेट, ऑनलाईन अथवा ऑफलाईन स्वरूपात (इ-पब्लिकेशन्स : इ-बुक्स, इ-नियतकालिके इत्यादी) साठवून ठेवलेला माहिती संग्रह होय.

डिजिटल ग्रंथालय हे डिजिटल माहिती साधनांशी



डिजिटल ग्रंथालय (Digital Library)

निगडित असून या ग्रंथालयात माहिती संग्रहण, माहिती शोध व माहितीचे संप्रेषण यासाठी माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. थोडक्यात, डिजिटल ग्रंथालये म्हणजे डिजिटल माहितीची साठवण व प्रतिप्राप्तीचे विस्तारीकरण होय. डिजिटल माध्यमातील डेटा (टेक्स्ट, प्रतिमा, ध्वनी, चलचित्रे, ॲनिमेशन इत्यादी) जो नेटवर्क प्रणालीवर उपलब्ध होऊ शकतो.

डिजिटल ग्रंथालये ग्रंथालयातील माहिती साधने नेटवर्कच्या माध्यमातून पुरवतात.

**डिजिटल ग्रंथालयाचे पैलू :** डिजिटल ग्रंथालयांच्या संग्रहात सर्व प्रलेख हे डिजिटल स्वरूपात उपलब्ध होतात, जसे डिजिटल डेटा, बहुमाध्यम स्वरूपातील डेटा (Multimedia Data), नेटवर्कच्या स्वरूपातील माहिती (Network Information), ई-प्रकाशने इत्यादींचा ह्यात समावेश होतो. हे सर्व वाचन साहित्य संगणक व संगणकीय नेटवर्कच्या मार्फत प्राप्त केले जाऊ शकते आणि संप्रेषित केले जाऊ शकते.

पारंपरिक ग्रंथालयास जाणवणारी जागेची समस्या डिजिटल ग्रंथालयामुळे दूर होते.

**डिजिटल ग्रंथालयाची वैशिष्ट्ये**

(१) डिजिटल ग्रंथालयात माहितीची निवड, माहितीचे संकलन, साठवण व माहितीची प्रतिप्राप्ती ही फक्त डिजिटल स्वरूपातच केली जाते.

(२) डिजिटल ग्रंथालयात विविध डिजिटल स्वरूपातील माहिती साधनांचा संग्रह उपलब्ध असतो व त्याद्वारे वाचकांना विविध माहिती सेवा पुरवल्या जातात.

(३) डिजिटल ग्रंथालयात तंत्रज्ञानाचा वापर होतो.

उदा.,

- Digital Library of India
  http://www.dli.gov.in
- J.R.D. Tata Memorial Library, Indian Institute of Science (IISC), Bengaluru
  http://www/library.iisc.ernet.in

**डिजिटल ग्रंथालयाचे फायदे**

१. वाचकांना वाचन साहित्य व माहिती प्राप्त करण्याकरिता भौगोलिक मर्यादा येत नाहीत.
२. सर्व वाचन साहित्य २४ × ७ × ३६५ उपलब्ध होतात. थोडक्यात, वेळेची मर्यादा येत नाही.
३. एकाच वेळेस अनेक वाचक एकच डिजिटल ग्रंथ अनेक ठिकाणाहून प्राप्त करू व वाचू शकतात.
४. वाचन साधनांची सुसंघटीतपणे साठवण केलेली असते व त्याचा उपयोग कोणत्याही दुव्यामार्फत (Through Link) करता येतो.
५. अतिशय जलदपणे माहिती प्रतिप्राप्ती होते.
६. दुर्मीळ स्वरूपाच्या माहिती साधनांचे जतन व संवर्धन करता येते.
७. कमीत कमी जागेत जास्तीत जास्त माहिती साठवता येते.
८. हायपर लिंकद्वारे दुसऱ्या ग्रंथालयातील डिजिटल वाचन साहित्य प्राप्त करता येतात.
९. पारंपरिक वाचन साहित्याच्या तुलनेत डिजिटल वाचन साहित्य तुलनेने कमी खर्चात उपलब्ध होऊ शकते.

**डिजिटल ग्रंथालयाचे तोटे**

१. कॉपीराईट कायद्याचे बऱ्याच वेळेस उल्लंघन होण्याची शक्यता असते.
२. सुरुवातीच्या काळात डिजिटल ग्रंथालये निर्माण करणे खर्चिक असते.
३. तंत्रज्ञानात सातत्याने बदल होत असल्याने ठरावीक काळानंतर नवीन तंत्रज्ञान आत्मसात करावे लागते. यासाठी अंदाजपत्रकात तरतूद करावी लागते.

**व्हर्च्युअल ग्रंथालय** (Virtual Library) **:** एक अथवा अनेक संगणक प्रणाली आणि नेटवर्कवर असलेले डिजिटल वाचन साहित्य म्हणजे व्हर्च्युअल ग्रंथालय होय. अशा ग्रंथालयांमध्ये डिजिटल वाचन साहित्य इंटरफेसद्वारे प्राप्त करता येते.

व्हर्च्युअल ग्रंथालयामार्फत बहुविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय डिजिटल वाचन साहित्य व सेवा दूरवरच्या

**व्हर्च्युअल ग्रंथालय (Virtual Library)**
**२४ × ७, कधीही आणि कोठेही उपलब्ध**




स्थानाहूनही प्राप्त करता येतात.

अनेक तज्ज्ञांनी 'व्हर्च्युअल ग्रंथालया'ची व्याख्या निरनिराळ्या पद्धतींनी केल्या आहेत. परंतु सर्वसामान्य 'व्हर्च्युअल ग्रंथालयाची व्याख्या पुढीलप्रमाणे सांगता येईल.

"व्हर्च्युअल ग्रंथालयातील वाचन साहित्याचे संकलन हे डिजिटल (Electronic) स्वरूपात असून त्यासाठी कोणत्याही स्वरूपाच्या मोठ्या इमारतीची (जागेची) अथवा भौगोलिक स्थानाची आवश्यकता नसते."

व्हर्च्युअल ग्रंथालये ही माहिती संप्रेषण संकल्पनेवर आधारित आहेत. यातील माहिती जगातील विविध नेटवर्क्सच्या आधारे शोधता येते. संगणक नेटवर्क्सच्या आधारे व इंटरनेटचा वापर करून माहितीची प्रतिप्राप्ती करता येते.

व्हर्च्युअल ग्रंथालयांनी पारंपरिक ग्रंथालयाची संकल्पना पूर्ण बदलून टाकली आहे. व्हर्च्युअल ग्रंथालयांमुळे माहिती संकलनाच्या व वाचन साहित्याच्या व्यवस्थापन पद्धतीत बदल झालेला आहे.

उदा.,

• Indian Virtual Library http://www.southasianist.info/india/

• The WWW Virtual Library http://vlib.org

**व्हर्च्युअल ग्रंथालयाचे फायदे**

(१) जागेची बचत होते.

(२) विविध स्वरूपात माहितीचा शोध घेता येतो.

(३) कोणत्याही स्थानाहून डिजिटल वाचन साहित्य प्राप्त करता येते.

(४) इंटरनेटवर उपलब्ध असलेल्या डिजिटल वाचन साहित्याचाही समावेश व्हर्च्युअल ग्रंथालयात होतो.

(५) डिजिटल मजकूर (Text) सुलभतेने डाऊनलोड करता येतो व हव्या त्या स्वरूपात उपलब्ध होतो.

(६) एका वेळेस अनेक वाचक त्यावरील डिजिटल वाचन साहित्य प्राप्त करू शकतात.

**व्हर्च्युअल ग्रंथालयाचे तोटे**

(१) प्रत्येक वाचन साहित्यास स्वतंत्र उपयोजक (User Interface) असतो.

(२) वाचकांना प्रत्येक माहिती उत्पादनांचा (Information Products), डेटाबेसचा लॉग-इन व पासवर्ड लक्षात ठेवावा लागतो.

(३) बरेचदा, माहिती डाऊनलोड व मुद्रित करण्यात अडचणी येतात.

(४) सर्वच वाचन साहित्य हे डिजिटल स्वरूपात उपलब्ध नसते.

(५) व्हर्च्युअल ग्रंथालये ही विद्युत पुरवठ्याच्या साहाय्याने व संगणक जाळ्यांच्या आधारे कार्य करत असतात. यात अडथळे येऊ शकतात.

**हे माहीत करून घ्या.**

**ज्ञानाधिष्ठित समाज :** आधुनिक युगास ज्ञानाधिष्ठित समाज असे म्हणतात. कारण प्रत्येक कार्यामध्ये ज्ञान व माहितीचा उपयोग अनिवार्य झालेला आहे. अशी ज्ञानसाधने सर्वत्र उपलब्ध होत आहेत. त्यामुळे प्रत्येक नागरिक ज्ञानसाधनांचा परिणामकारक उपयोग करू शकतो.

ग्रंथालये ही सामाजिक दृष्टिकोनातून अत्यावश्यक बाब असून त्यांच्याशिवाय व्यक्तिगत जीवनात व पर्यायाने सामाजिक जीवनात सकारात्मक परिणाम घडून येणार नाहीत. कारण विकास व शैक्षणिक प्रगती तसेच व्यक्तिमत्त्व विकासात ग्रंथालये महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडतात. यामुळे देशाची प्रगती आपोआपच साधली जाईल. म्हणूनच देशाची प्रगती होण्याकरिता ग्रंथालयांच्या साहाय्याने ज्ञानाधिष्ठित समाजाची निर्मिती होणे गरजेचे आहे.

# डॉ. शियाली रामामृत रंगनाथन यांचा अल्प परिचय



डॉ. रंगनाथन यांचा १२ ऑगस्ट हा जन्मदिन भारतात राष्ट्रीय ग्रंथपाल दिवस म्हणून साजरा केला जातो.

ग्रंथपाल व ग्रंथालय शास्त्रज्ञ होण्यापूर्वी ते एक गणितज्ञ होते.

१९२४ मध्ये ते मद्रास विद्यापीठाचे प्रथम ग्रंथपाल म्हणून नियुक्त झाले.

बहुमान :

(१) भारत सरकारने त्यांच्या ग्रंथालय शस्त्रातील मौल्यवान योगदानाबद्दल त्यांना १९५७ मध्ये 'पद्मश्री' देवून गौरव केला.

(२) भारतीय टपाल खात्याने १९९२ मध्ये त्यांच्यावर तिकीट काढले होते.




डॉ. रंगनाथन हे भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक म्हणून ओळखले जातात.

त्यांनी १९३१ मध्ये ग्रंथालय शास्त्राची पंचसूत्री, १९३३ मध्ये कोलन वर्गीकरण पद्धती, तर १९३४ मध्ये क्लासिफाईड कॅटलॉग कोड लिहिले.

त्यांनी १९४४ ते १९५३ पर्यंत इंडियन लायब्ररी असोसिएशनचे नेतृत्व केले.

१९६२ मध्ये त्यांनी बेंगळूरूच्या डॉक्युमेंटेशन संशोधन आणि प्रशिक्षण केंद्राची स्थापना केली आणि त्याचे ते प्रमुख झाले.

डॉ. रंगनाथन यांनी मांडलेली ग्रंथालय शास्त्राची पंचसूत्री :

(१) ग्रंथ हे उपयोगासाठी आहेत.

(२) प्रत्येक वाचकाला त्याचा ग्रंथ मिळाला पाहिजे.

(३) प्रत्येक ग्रंथाला त्याचा वाचक मिळाला पाहिजे.

(४) वाचकांचा वेळ वाचवा.

(५) ग्रंथालय ही वधिर्ष्णू संस्था आहे.

## स्वाध्याय

१. (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.

(१) डॉ.रंगनाथन हे मूलतः .......... विषयाचे प्राध्यापक होते.
(अ) गणित (ब) इतिहास
(क) तेलुगु (ड) भौतिकशास्त्र

(२) ......... हे भारतीय ग्रंथालय आणि माहितीशास्त्राचे जनक आहेत.
(अ) डॉ.भटकर (ब) डॉ.कस्तुरीरंगन
(क) डॉ.रंगनाथन (ड) डॉ.ब्राऊन

(३) भारताचे राष्ट्रीय ग्रंथालय ......... येथे आहे.
(अ) मुंबई (ब) दिल्ली
(क) कोलकाता (ड) चेन्नई

(४) ......... यांनी ग्रंथालय शास्त्राची पंचसूत्री सांगितली.
(अ) विश्वनाथन (ब) रंगनाथन
(क) केशवन (ड) क्रिशनकुमार

(५) ही ग्रंथालये दृष्टिदोष असणाऱ्यांना ......... लिपीत वाचन साहित्य उपलब्ध करून देतात.
(अ) अरब (ब) मोडी
(क) रोमन (ड) ब्रेल

(ब) चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.

(१) माहिती संप्रेषणाचे प्रमुख साधन – ग्रंथालय
(२) सुरुवातीच्या काळातील ग्रंथालय – अभिलेखागार व वस्तुसंग्रहालये
(३) ग्रीकमधील पहिले ग्रंथालय – एस.आर.रंगनाथन
(४) मध्ययुगातील महत्वाचे शैक्षणिक केंद्र – बगदाद

(क) खालील विधाने व योग्य कारणे यांची सांगड घालून दिलेल्या पर्यायांतून योग्य पर्यायांची निवड करा.

(१) विधान (अ) : ग्रंथालये म्हणजे अभ्यास, संशोधन, संदर्भ आणि मनोरंजन याकरिता केलेला ग्रंथसंग्रह आहे.
कारण (ब) : ग्रंथालये उपयोगाकरिता आहेत.
पर्याय: (i) (अ) चूक (ब) बरोबर
(ii) (अ) बरोबर (ब) चूक
(iii) (अ) व (ब) दोन्हीही चूक
(iv) (अ) व (ब) दोन्हीही बरोबर

(२) विधान (अ) : जे.एच.शेरा यांच्या मते, वाचन साहित्य व वाचक यांचा एकत्रित समन्वय म्हणजे ग्रंथालय होय.
कारण (ब) : ग्रंथालयात वाचनसंग्रह केवळ संग्रहाकरता असतो.
पर्याय: (i) (अ) चूक (ब) बरोबर
(ii) (अ) बरोबर (ब) चूक
(iii) (अ) व (ब) दोन्हीही चूक
(iv) (अ) व (ब) दोन्हीही बरोबर

(ड) नावे लिहा.

(१) ग्रंथालय शास्त्राचा पाचवा सिद्धान्त .....
(२) पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांसाठीचे ग्रंथालय या ग्रंथालय प्रकारात मोडते .....

२. पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा.

(१) ग्रंथालय ही वर्धिष्णू संस्था नाही.
(२) ग्रंथपाल हा वाचक व ग्रंथ साहित्य यांच्यामधील दुवा असतो.
(३) वाचक, वाचन साहित्य आणि ग्रंथपाल हे ग्रंथालय त्रिमितीचे आधारभूत घटक आहेत.

३. टीपा लिहा.

(१) ग्रंथालय : इतिहास व विकास
(२) शैक्षणिक ग्रंथालय
(३) डिजिटल ग्रंथालय

४. पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा

(१) शैक्षणिक ग्रंथालयांचे विविध प्रकार व कार्ये स्पष्ट करा.
(२) ग्रंथालय शास्त्राची पंचसूत्री व त्यांचा ग्रंथालयावरील प्रभाव स्पष्ट करा.
(३) डिजिटल व व्हर्च्युअल ग्रंथालयांमधील फरक स्पष्ट करून त्यांचे फायदे व तोटे लिहा.

### उपक्रम

(१) सार्वजनिक ग्रंथालयाला भेट देऊन त्यावर अहवाल लिहा.
(२) विद्यापीठ ग्रंथालयाला भेट देऊन त्या ग्रंथालयातील सेवांचे वर्णन करा.

⌘⌘⌘